
केतकी शहा
क्षणभंगूर



# क्षणभंगूर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# क्षणभंगूर

कादंबरी

लेखिका

केतकी शहा





# क्षणभंगूर

लेखिका : केतकी शहा

+91(8007487799)

ketakee.shah@gmail.com

P-303, श्रीनिवास ग्रीनलँड काऊंटी, मानाजी नगर, नऱ्हे, पुणे -४११०४१

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १ मे २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# नमस्कार रसिक वाचकहो !!



माझ्या "अबोली" आणि "अरुणोदय" या पहिल्या दोन पुस्तकांना आपणा सर्वांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.. माझ्या लेखनाला आपण दिलेल्या उदंड प्रेम, आशीर्वाद आणि प्रतिसादाबद्दल मी आपणा सर्वांची आभारी आहे.

आपण रसिक वाचकांनी घेतलेली दखल आणि दिलेले प्रोत्साहन मला नवनवीन विषयांवर लेखन करण्यास.. न पाहिलेल्या क्षितिजाला गवसणी घालण्यास प्रोत्साहित करत आहे.. त्यातूनच या माझ्या तिसऱ्या पुस्तकाचा जन्म झाला..

या वेळेस थोडा वेगळा प्रयत्न करण्याचे धाडस करत आहे..

याही प्रयत्नाला आपणा सर्वांचे भरभरून प्रेम व आशीर्वाद लाभेल अशी आशा करते..

माझ्या कथेला तुम्हा रसिक वाचकांपर्यंत पोहचवण्यास साहित्य सेतूचे काम करणाऱ्या ई साहित्य टीम आणि सुनील सामंत यांची मी मनःपूर्वक आभारी आहे..

-केतकी शहा

+91(8007487799)

ketakee.shah@gmail.com

P-303, श्रीनिवास ग्रीनलँड काऊंटी, मानाजी नगर, नऱ्हे, पुणे -४११०४१



# नमस्कार रसिक वाचकहो!!

माझे नाव केतकी विजयानंद शहा. मी पुणे येथे आय टी क्षेत्रात कार्यरत आहे.

मी लहानपणापासूनच वाचन आणि लेखन हे माझे छंद जोपासले आहेत..त्यांना वेळोवेळी ज्येष्ठ विचारवंतांच्या, साहित्यिकांच्या विचारांचे खतपाणी देऊन.. त्यांची योग्य निगा राखून त्यांना फुलवत ठेवलेले आहे. बहिणाबाई, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, ग. दि. माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर यांसारख्या साहित्य शिरोमणीं कडून मला बरेच शिकण्यास मिळाले.. त्यांच्या साहित्यरूपी वटवृक्षाच्या सावलीत मी वाढले..

खरे तर लेखन आणि वाचन यांच्यासाठी छंद हा शब्द लहानपणा करिता वापरता येईल.. आता हे दोन्हीही माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत..

हातात लेखणी आली की शब्द कागदावर आपोआप उमटू लागतात.. ते शब्द बऱ्याचदा काव्य, कथा, लेख स्वरूपात कागदावर आपले अस्तित्व निर्माण करतात..

मला निरनिराळ्या लेखकांच्या लेखनशैलीचा अभ्यास करायलाही आवडतो..त्यातून फार वैविध्यपूर्ण गोष्टी शिकायला मिळतात..

मराठी माझी मायबोली आहे.. मराठी वाचन आणि लेखन संस्कृती जपण्याकरिता मी सतत प्रयत्नशील असेन..

आपण रसिक वाचकही ती जपण्यास..वृद्धिंगत करण्यास हातभार लावाल अशी आशा करते..

-केतकी शहा

+91(8007487799)

ketakee.shah@gmail.com

P-303, श्रीनिवास ग्रीनलँड काऊंटी, मानाजी नगर, नऱ्हे, पुणे -४११०४१

क्षणभंगूर






केतकी शहा



अस्वीकरण/ डिसक्लेमर

हि कथा तसेच कथेतील व्यक्ती, पात्रे, स्थळे, संस्था, नावे, वैद्यकीय बाबी, प्रसंग संपूर्ण काल्पनिक आहेत. त्यांचे कोणत्याही जिवीत अथवा मृत व्यक्तींशी तसेच घटनेशी साधर्म्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.



# अर्पणपत्रिका

क्षणभंगुर भावनांना खतपाणी न घालता,
त्या भावनांवर मात करत
आपली तत्वे आणि मूल्यांशी प्रामाणिक राहत
आयुष्यरूपी क्षितिजाला गवसणी घालणाऱ्या
सर्व तत्त्ववेत्त्यांना अर्पण.

-केतकी शहा



प्रकरण १

न्यायालय..

न्यायासनावर विराजमान होऊन न्यायाधीशसाहेब हातातील कागदपत्रे पडताळून पाहत होते..

पांढरा सदरा.. गळ्याभोवती लटकणारा पांढरा नेक बँड.. त्यावरून चढवलेला काळा कोट.. डोक्यावरील पांढरे केस.. डोळयांवर असलेला पण नाकाच्या मध्यापर्यंत अर्धवट खाली आलेला चष्मा..

न्यायालयातील भिंतीवरील घड्याळात सकाळचे ११ चे ठोके पडतात..

न्यायासना समोरील बाजूस सर्व जनता.. दोन्ही पक्षाचे वकील.. पत्रकार.. गणवेशातील पोलीस अधिकारी..

समोर बसलेल्या सर्वसामान्य जनतेचा चाललेला गोंधळ.. आपापसात चाललेली चर्चा.. गरिमा- तन्मय केसभोवती पसरलेले गॉसिपचे जाळे.. निकालाची उत्सुकता.. पत्रकारांची निकाल ऐकून.. लिहून घेण्यासाठी चाललेली तयारी..

दोन्ही पक्षाची बाजू मांडून झालेली असल्याने न्यायाधीश साहेब काय निर्णय देतात याची उत्सुकता.. प्रतीक्षा..

गरिमा समोर आरोपीच्या पिंजऱ्यात उभी..

गरीमा ज्या पिंजऱ्यात उभी होती त्याच्या शेजारीच न्यायासनाच्या बाजूला न्यायदेवतेची मूर्ती..

डोळयांवर पट्टी असल्याने योग्य न्यायनिवडा करण्यासाठी तिचे साक्षी पुराव्यांवर असलेले अवलंबन.. त्यामुळे न्यायसनाचा समतोल सांभाळण्यासाठी होणारी तिची दमछाक..

कोर्टरूम मधील गर्दी.. तेथील वातावरणात भरलेला कुबट वास.. कोर्टरूम मधील पंखा असूनही नसल्या सारखा.. त्यामुळे घामाने डबडबले शरीर.. निकालापूर्वीची भिती.. या सर्वांमुळे तिची खूप घुसमट होत होती..



ती साडीच्या पदराने थोडे वारे घेऊन चेहऱ्यावरील घाम पुसत होती.. तिच्या सरळ तपकिरी छटा ल्यालेल्या केसांमध्येही घामाच्या थेंबांनी तात्पुरते का होईना आपले जग वसविले होते..

कारागृह.. न्यायालय.. वकिलाकडे वरचेवर माराव्या लागलेल्या चकरा.. एकंदरीतच काय तर या खटल्यामुळे गरिमाची बरीच दगदग झाली होती..

एवढे सगळे गरिमाच्या सोबत समांतर रेषेत चालत असूनही तिच्या चेहऱ्याच्या नितळ कांतीवर तसेच निळयाशार डोळयांमध्ये तेज कायम होते..

न्यायाधीश साहेब निकाल जाहीर करण्याच्या तयारीत असतानाच कोर्टरूमच्या दरवाज्याकडे गरीमाची नजर जाते..

तिथे काहीतरी विचित्र हालचाल तिला जाणवते.. गरीमाला एक सावली दिसते..

हळूहळू ती सावली मोठी होते आहे आणि कोर्टरूमच्या दिशेने सरकत आहे असे तिला जाणवते..



काळया कोटमधील एक व्यक्ती तिला दिसते पण त्याच्या डोक्यावरील काळी टोपी गरिमाला त्या व्यक्तीचा चेहरा पाहू देत नव्हती..

त्या व्यक्तीच्या हालचाली मात्र संशयास्पद वाटत होत्या आणि त्या गरीमाला अस्वस्थ करत होत्या..

## प्रकरण २

न्यायाधीश साहेब ऑर्डर ऑर्डर करतात तशी गरिमा भानावर येते..

कोर्टरूम मधील गोंधळ बंद होऊन शांतता पसरते.. सगळे कान टवकारून न्यायाधीश साहेब काय निकाल देतात ते ऐकू लागतात..

न्यायाधीश साहेब निकाल जाहीर करतात..

“न्यायालयापुढे सादर करण्यात आलेल्या सर्व पुराव्यांची सत्यता न्यायालयाने पडताळून पाहिली आहे.. तसेच शवविच्छेदन अहवाल व सर्व साक्षीदारांच्या नमूद करण्यात आलेल्या साक्षींचीही न्यायालयाने दखल घेतली आहे.... शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण विषप्राशन असे नमूद केले गेले आहे..”

“हे सर्व साक्षी आणि पुरावे पडताळून पाहिल्या नंतर आणि शवविच्छेदन अहवालाच्या आधारे न्यायालय या निर्णयावर पोहोचले आहे की गरिमा यांच्या विरुद्ध कोणताही सबळ पुरावा न मिळाल्याने त्यांचा या प्रकरणात सहभाग

असल्याची शक्यता न्यायालय फेटाळून लावत आहे.. आणि गरिमा यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे..”

“तसेच मिस्टर वरुण यांना यापुढे पुरेशी माहिती आणि पुरावे असल्याशिवाय कोणावरही बोट ठेवणे टाळण्याची सक्त ताकीद न्यायालय देत आहे..”

“तसेच त्यांना न्यायालयाची दिशाभूल केल्याबद्दल पाच हजार रूपये दंड अथवा १ दिवसाच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे..”

वरुण मात्र हताश नजरेने न्यायाधीश साहेबांकडे आणि न्यायदेवतेच्या मूर्तीकडे बघत राहतो..

वरुण.. तिशीच्या घरातील तरुण.. पण सामाजिक दृष्ट्या थोडा वेगळ्या चालीरीतीचा.. त्याची उभे राहण्याची पद्धत.. चालणे.. बोलताना होणारे हातवारे.. एकंदरीतच त्याची देहबोली थोडी बायकी वाटत होती..

तो विचार करत राहतो हे कसे शक्य आहे..



“माझे आणि तन्मयचे जेव्हा जेव्हा बोलणे झाले तेव्हा तेव्हा त्याच्या बोलण्यात नेहमी हेच असायचे की गरीमाचा अहं भाव दुखावल्याने.. तिची व तिच्या घरच्यांची तन्मयने फसवणूक केल्याच्या असूयेतून गरीमाकडून त्याच्या वाट्याला असह्य असा मानसिक त्रास येत होता..”

“दररोज न चुकता या मानसिक कुचंबणेला सामोरे जावे लागत असल्याची बतावणी तन्मयने वारंवार माझ्याजवळ केली होती..”

त्याला गरिमा दिसते.. मकरंदकडे पाहत असलेली..

न्यायालयात चर्चांना उधाण येते.. गडबड गोंधळ सुरु होतो..

न्यायाधीश साहेब ऑर्डर ऑर्डर करत न्यायालयीन कामकाज संपल्याचे जाहीर करतात..

गरिमा न्यायाधीश साहेबांचे आभार मानते..

डोळे पुसत पुसत एक चोरटा कटाक्ष मकरंदकडे टाकत उर्वरित कायदेशीर औपचारिकता पूर्ण करण्यासाठी ती न्यायालयातून बाहेर पडते..

मकरंदला जे काही कळायचे ते कळलेले असते..

बाहेर पडत असताना ती कोर्टरूमच्या दरवाज्याजवळ एक क्षण थबकते.. काळया कोटमधील मगाशी दिसलेली व्यक्ती कुठे नजरेस पडते का हे ती पाहत होती..

पण तिच्या हाती फक्त निराशा आली..

ती व्यक्ती कोण होती आणि तिच्या संशयास्पद हालचालींचा काय अर्थ घ्यायचा.. खरेच इथे कोणी होते की आपल्याला निव्वळ भास झाला होता.. या विचारांनी ती अस्वस्थ झाली..

पण तिच्या सद्यःस्थितीतील आनंदाने तात्पुरते त्या अस्वस्थतेच्या भावनेवर पांघरूण घालण्यास मदत केली होती..

पत्रकारांची गर्दी बाहेर तिची वाट बघत उभी होती.. तिला पोलिसांनी आपल्या सुरक्षेच्या रिंगणात ठेवले होते तरीही बऱ्याच पत्रकारांनी तिला प्रश्न विचारून भंडावून सोडले..

गरीमाला या कोर्ट केसने सेलिब्रिटींच्या रांगेत नेऊन ठेवले होते असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही..

पोलिसांनी पत्रकारांना डावलून सराईतपणे गरीमाला त्यांच्या घोळक्यातून बाहेर काढले..

गरिमा फक्त हात जोडून परमेश्वराचे आभार मानत चालत होती..

निर्दोष मुक्त होऊन गरिमा तिच्या घरी येते..



प्रकरण ३

गरिमा बरेच दिवसांनी आपल्या घरी आलेली होती..

हा खटला चालू असे पर्यंत तिला सतत पोलीस ठाण्याची वारी करावी लागलेली असते..

आज तब्बल सहा महिन्यांनी ती घरी परतली होती..

घरात शिरताच इतके दिवस घर बंद असल्या कारणाने निर्माण झालेल्या कोंदट कुबट वासाने गरिमाचे घरात स्वागत केले..

तिला अचानक तो दिवस आठवला जेव्हा लग्नानंतर प्रथम ती माप ओलांडून अभ्यंकरांची सून म्हणून या घरात आली होती.. तिचे झालेले जंगी स्वागत.. तिच्या नशिबाचा इतरांना हेवा वाटावा एवढे चांगले सासर तिला मिळाले असल्याचा तिला अभिमान वाटत होता..



एक तो दिवस होता आणि एक आजचा दिवस.. नशीब कुठल्या कुठे घेऊन आले आहे आपल्याला..

विचारांतून बाहेर येत सर्वप्रथम तिने दिवाणखान्यातील सगळया खिडक्या उघडल्या.. पंखा आणि दिवे चालू केले..

तिला मोकळया हवेत बरे वाटत होते.. तिला वेगळयाच ऊर्जेचा भास झाला..

इतके दिवस पोलीस ठाण्याच्या वाऱ्या.. आसपासचे निराश व गुन्हेगारी वातावरण.. यामुळे तिला फार नैराश्य आल्यासारखे वाटत होते..

दिवाणखान्यात गरिमाला सजावटीसाठी तिने मोठ्या हौसेने केलेल्या गोष्टी दृष्टीस पडल्या.. लग्नानंतर लावलेली पेटिंग्ज बघत भिंतीवरून हात फिरवत हळूहळू समोरील भिंतीला टेकून असलेल्या शोकेसजवळ गरिमा पोहोचली.

शोकेसवर.. त्याच्या काचांवर तसेच त्याच्या आरश्यावर बरीच धूळ बसलेली होती..

शोकेसच्च्या आरश्यावर आपला हात फिरवून गरिमा बहुधा त्या धूलिकणांना आपण परतल्याची जाणीव करून देत असावी..

शोकेसच्च्या आरश्यावर हात फिरवला तसे तिला आरश्यामधे तिचे प्रतिबिंब दिसले..

गोरा रंग.. नितळ कांती..  निळेशार डोळे.. तपकिरी छटा ल्यालेले लांबसडक रेशमी केस.. सुडौल बांधा..

कोणीही म्हणणार नाही की नजीकच्या काळात तिने बरेच काही भोगले आहे.. जेलच्या वातावरणाचा तिच्या सौंदर्यावर कसलाही परिणाम झालेला दिसत नव्हता..

गरिमा आपले चिरतरुण सौंदर्याने नटलेले प्रतिबिंब आरशात पाहून स्वतःशीच हसू लागली..

आपल्या रेशमी केसांना रबर बँडच्या विळख्यातून सोडवत त्यांच्या बटांतून हात फिरवत हसत हसतच तिने शोकेसच्च्या शेजारी उजव्या बाजूला असलेले गॅलेरीचे दार उघडले..



दार उघडताच भसकन वारा अंगावर धावून आला आणि आपल्या बरोबर उडवत.. भिरभिरत सोबत घेऊन आला.. आठवणींचा पाला पाचोळा..

गरिमा त्या पाला पाचोळयापासून स्वतःला वाचवू.. सावरू.. पाहत होती.. पण जणू चक्रीवादळाप्रमाणे त्याने गरीमाला चहुबाजूने घेरले होते.. जखडून टाकले होते..

एक दीर्घ विराम घेऊन मोकळया हवेत दीर्घश्वास घेत गॅलरीत असलेल्या आरामखुर्चीत गरिमाने स्वतःला स्थिरावले..

आराम खुर्चीला हेलकावे देत गरिमा आठवणींच्या हिंदोळयावर अलवार झोके घेऊ लागली..

हळूहळू गरीमाच्या दीर्घ विरामाचे रूपांतर हास्यात होते.. गरिमा भान हरपून जोरजोरात हसू लागते..

## प्रकरण ४

अगदी विकृत हास्य होते ते..

बराच वेळ एकटीच विकृत हास्याशी सलगी करत गरिमा आरामखुर्चीवर हेलकावे घेत बसली होती..

काही वेळाने स्वतःला त्या निर्माण झालेल्या चक्रीवादळाच्या स्वाधीन करत.. त्यात वाहत वाहत ती आटपाट नगरात पोहोचली..

आपल्या विकृत हास्याला थोडा विराम देत.. मनात दाटलेल्या.. दडवलेल्या भावनांना वाट मोकळी करून देत गरिमा स्वतःशीच संवाद साधू लागली..

“माणूस कशाच्या शोधात आयुष्यभर भटकत असतो याची कल्पनाही बहुधा त्याला नसते.. त्याला वाटत असते की आपले आयुष्य आपण घडवीत आहोत.. आपल्या आयुष्याची सगळी सूत्रे आपल्या हातात आहेत..”

“पण तो बऱ्याचदा हे विसरतो की तो फक्त आपल्या सर्वांच्या वर जो स्थित आहे त्या निसर्गनिर्मात्याच्या दिग्दर्शनाखाली वावरत असतो..”

“ऍक्शन आणि कट तो बोलत असतो..”

“माणूस मात्र सारे आपणच घडवून आणले या आविर्भावात जगत असतो..”

“अशा परिस्थितीतही माणूस असलेल्या गोष्टींवर आपला हक्क बजावत असतो.. वेळ प्रसंगी त्याच्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावत असतो..”

“जे असते ते देखील सारे क्षणभंगुर असते... या क्षणी आहे तर पुढच्या क्षणी नाही..”

“अशाच घटनांमधून मग राग.. द्वेष.. मत्सर.. अशा भावनांचा उगम होतो.. आणि हि मत्सराची सरिता निरंतर वाहत राहते..”

“कितीकाळ आणि कुठे पर्यंत हे कोणालाही ठाऊक नसते..”

“या क्षणभंगुर भावनांना वेळीच आवर न घातल्याने.. खोलवर मनाच्या कुठल्याश्या कप्प्यात निपजत ठेवल्याने.. त्या रौद्रावतार धारण करून आपल्या मनाचा आणि कृतींचा आपल्याही नकळत ताबा घेतात..”

“आणि त्याच्या प्रभावाखाली ज्या कृती किंवा कर्मे घडतात त्या आपण करत असूनही आपल्या नियंत्रणात नसतात..”

प्रकरण ५

“अगदी हेच घडले होते याबाबतीत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही..”

“अशाच धर्तीवर गेले काही महिने माझ्या आणि माझ्या नवऱ्यासाठी.. तन्मयसाठी फार काही बरे गेले नव्हते..”

“एकमेकांशी फार तुटक वागत बोलत होतो.. फक्त घरातील भिंती बोलत असायच्या..”

“मत्सर इतका पराकोटीला पोहचला होता की दोघेही फक्त एकमेकांच्या चुका शोधण्याच्या प्रयत्नात असायचो.. चूक सापडली की एकमेकांना ऐकवायला दोघेही मोकळे..”

“तन्मयचे उशिरा घरी येणे.. ऑफिसचे कारण सांगून बाहेरच कुठेतरी असणे.. या सर्व गोष्टी मला त्याच्या ऑफिसमधे फोन केल्यावर कळायच्या.. हळूहळू त्याचा खोटेपणा माझ्या लक्षात येत होता..”



“कधी कधी वाटायचे की तन्मयच्या आयुष्यात कोणी दुसरी तर नसेल ना.. त्याच्या मनाविरुद्ध हे लग्न झाले असेल का.. त्याचे बाहेर काही अफेयर वगैरे तर चालू नसेल ना..”

मनाची ढोरे अशी चौफेर उधळत असायची सतत..

बहिणाबाईंनी किती सुंदर ही मनःस्थिती शब्दात मांडली आहे..

“मन मोकाट मोकाट
याच्या ठाई ठाई वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्या रे लाटा”

“विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे न देता टाळाटाळ.. लांबण.. सगळयाच गोष्टी माझ्या डोक्यात जात होत्या..”



नुसती जीवाची तगमग होत राहायची.. काय आणि कुठपर्यंत जाणार हे सगळे काही कळण्यास मार्ग नव्हता..

“या आणि अशाच तत्सम विचारांनी मी फारच हताश झाले होते..”

“मी तरीही तन्मय स्वतःहून त्याच्या तोंडाने गोष्टी सांगेल या आशेवर थोडे दिवस बसले होते..”

“पण छे.. तो काही बोलायलाच तयार नव्हता.. त्याने स्वतःहुन कधीच काहीच सांगितले नाही..”

“मी मात्र या प्रकरणाचा छडा लावायचे ठरविले होते..”

“कसे आणि काय करावे जेणेकरून आपल्या आयुष्यात साचलेले हे धुके दूर होईल ते काही कळण्यास मार्ग नव्हता..”

“याच दैनंदिनीमुळे मनावर खूप आघात होत होते.. कधी कधी तर वेदना इतक्या असह्य होत की शब्दात मांडता येत नसत..



वारंवार एकांत आणि बोचरी सल वाट्याला येत असे..

एके दिवशी दिवाणखान्या मधे बसल्या बसल्या या साऱ्या साचलेल्या भावना शब्दरूपात गरीमाच्याही नकळत तिच्या तोंडून बाहेर पडल्या..

"वेदना हृदयी अशा मज तयाचा थांग ना..

व्रण तुला दिसलेच नाही का बरे सांग ना.."

सांग ना.. सांग ना.. करत गरिमा हुंदके देऊ लागली..



प्रकरण ६

आठवणींतून बाहेर येत ती परत स्वतःशी बोलू लागली..

“मी मात्र या प्रकरणाचा छडा लावायचे मनाशी निश्चित केले होते..”

“काय करता येईल असे विचार करत असतानाच एका गुप्तहेर संस्थेची जाहिरात समोर दिसली..”

“आपल्या नवऱ्याचे प्रताप जाणून घेण्यासाठी त्याच्या हालचालींवर असे इतरांकरवी पाळत ठेवणे खरेतर मनाला अजिबात पटत नव्हते..”

“पण तन्मयने माझ्यासमोर दुसरा कोणताच पर्याय शिल्लक ठेवला नव्हता..”

“अजूनही मी द्विधा मनःस्थितीतच होते..”

“काय करावे.. काय नको.. करत आहोत ते मनाला पटत नसताना करायचे का?”

“त्याच द्विधा मनःस्थितीत जाहिरातीवर छापलेला नंबर घेऊन मी त्या गुप्तहेर संस्थेशी संपर्क साधला..”

“गुप्तहेर संस्थेचे नाव होते इनविन्सीबल..”

“प्राथमिक स्तरावर गुप्तहेर संस्थेच्या नियमावली विषयी मला सविस्तर माहिती देण्यात आली.. तसेच गुप्तहेर संस्थेकडून कशी माझ्या सर्व माहिती बाबत गुप्तता पाळली जाईल याची मला सविस्तर कल्पना देण्यात आली..

त्यानंतर कामाच्या मोबदल्यात आकारल्या जाणाऱ्या शुल्काविषयी.. कामाविषयी.. कामाच्या स्वरूपाविषयी तसेच पेमेंट विषयी गुप्तहेर संस्थेशी चर्चा झाली..”

“इनविन्सीबल संस्थेतर्फे संजय नावाचा गुप्तहेर माझ्या कामासाठी रुजू करण्यात आला..”

“गुप्तहेर संजय मला इनविन्सीबलच्या ऑफिस मध्ये भेटला.. माझ्याकडून केस समजून घेण्याचा त्याचा प्रयत्न होता..”

“अतिशय तरुण.. राजबिंडा.. व्यवस्थित पेहरावात असलेला तो.. नोटपॅड आणि पेन घेऊन माझ्या समक्ष येऊन बसला..”

“गुप्तहेर संजयने केस समजून घेण्यासाठी दोन ते तीन दिवस घेतले..”

“मी संजयला तन्मय संदर्भात हवी असलेली सर्व प्राथमिक माहिती पुरवली.. त्याचे अलीकडचे वागणे.. त्याच्या सवयी.. त्याचे वेगळे व्यक्तिमत्त्व जे मला लग्नानंतर जाणवू लागले होते..”

“संजयला केस ऐकून बरेच प्रश्न पडले..  मी त्याच्या सर्व प्रश्नांची माझ्या परीने उत्तरे देण्याचा प्रयत्न केला..”

"संजयने जवळ जवळ महिनाभर तन्मयच्या नकळत त्याच्यावर पाळत ठेवली.. तो कुठे जातो.. काय करतो.. कोणाला भेटतो या सर्वांवर बारीक लक्ष ठेवले.."

"तो दररोज मला तन्मयची घरातून बाहेर पडल्यापासून ते तो रात्री घरी येईपर्यंतची दैनंदिनी सांगत असे.."

"पहिले १५-१६ दिवस फार काही लक्षवेधी हाती लागले नाही.."

"पण हळूहळू पाणी कुठे तरी मुरत असल्याचा संशय गुप्तहेर संजयला येऊ लागला.. आणि तिथून पुढे प्रत्येक दिवसागणिक त्याचा संशय बळावत गेला.."

"वरुणच्या घरी तन्मयचे दररोज येणे जाणे होते.."

"वरुण आणि तन्मय चार ते पाच वर्षांपासून एकमेकांना ओळखत होते.. तन्मय आणि वरुण पूर्वी एकाच कंपनीत कामाला होते.. तिथून त्यांची ओळख झाली.. ओळख वाढत गेली आणि ते खूप चांगले मित्र झाले.."

प्रकरण ७

“मित्र हा हा हा..”

“आभासी नाते.. जगाला भुलविण्यासाठीचे.. सामाजिक प्रतिष्ठेच्या चौकटीत बसवण्याकरिता आवरण चढविलेले आभासी नाते..”

“गुप्तहेर संजयने तन्मय वर पाळत ठेवून.. आपले हेरगिरीचे कसब पणाला लावून महत्वाची माहिती संपादित केली..”

“त्याने शेजार पाजाऱ्यांकडेही विचारपूस केली..”

वरुणच्या सदनिकेच्या गॅलरीसमोर विरुद्ध बाजूस गॅलरी असलेल्या सदनिकेमधे जाऊन संजयने चौकशी केली..आणि बऱ्यापैकी शॉकिंग माहिती मिळाली..

संजयने वरुणचे नाव घेताच मिसेस कुलकर्णींच्या चेहऱ्यावर अतिशय विचित्र हावभावांनी गर्दी केली..  आणि त्यांनी आपल्या आत साचलेल्या भावनांना संजयसमोर वाट मोकळी करून दिली..

"अहो काय सांगायचे तुम्हाला.. आजकालच्या पिढीला वागण्याचे ताळतंत्रच राहिले नाहीय.. बऱ्याचदा त्यांच्या गॅलरीमधे दिसतो वरुण आणि त्याच्या बरोबर असणारा तो मुलगा.."

“हे सर्व परदेशात चालते असे ऐकले होते.. पण त्याची मुळे भारतातही रुजू लागली आहेत हे पाहून कळतच नाही आहे की आपण प्रगती पथावर आहोत की अधोगती पथावर.. "

"आपण कुठे आहोत..  काय करत आहोत याचे भानही राहत नाही या लोकांना.. छे मला तर बोलवत पण नाही आहे.."

“कुठून यांच्या गॅलरीसमोर आमची गॅलरी आली असे वाटते आहे आता.. गॅलरीमधे संध्याकाळी बसण्याची सोय राहिली नाही आहे हल्ली.. देव जाणो काय काय बघायला मिळणार आहे अजून या आयुष्यात.. "

थोडा वेळ शांतता पसरली.. संजय मिसेस कुलकर्णी पूर्वपदावर येण्याची वाट बघत होता..

थोड्यावेळाने संजयने विषयाला हात घातला.. "मिसेस कुलकर्णी.. आपण फक्त मला त्या दुसऱ्या मुलाची ओळख पटवून घेण्यास मदत कराल का? आपण त्याचा फोटो ओळखू शकाल का?"

"प्रयत्न करते मिस्टर संजय.." मिसेस कुलकर्णी

संजयने आपल्या जवळील तन्मयचा फोटो बॅगेतून बाहेर काढला आणि मिसेस कुलकर्णींसामोर धरला.. मिसेस कुलकर्णींनी ड्रॉवर मधून आपला चष्मा काढला आणि त्या फोटोकडे पाहू लागल्या..

"हाच आहे तो.. हो हाच आहे.. "

संजयला आता सगळ्या गोष्टींची लिंक लागली होती.. तो आता गरीमाला सुपूर्त करण्यासाठी पुरावे गोळा करण्याच्या तयारीस लागला..

त्याला त्या दिवशी तरी मिसेस कुलकर्णींच्या गॅलरीत बसून काही दृष्टीस पडले नाही..

पुरावे गोळा करणे वाटत होते तितके सोपे नव्हते..

दुसऱ्या दिवशी परत त्याच वेळेला संजय मिसेस कुलकर्णींच्या गॅलरीत बसून राहिला.. आणि त्याला जे हवे होते ते त्याने मिळविले होते..

## प्रकरण ८

संजयला हवे ते त्याने मिळविले होते..

आपल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या कॅमेऱ्यात त्याने गरीमाला सुपूर्त करण्याचे पुरावे कैद केले..

मिळवलेले पुरावे गुप्तहेर संजयने इनविन्सीबल गुप्तहेर संस्थेकडे सुपूर्त केले..

संजयला या केसचे सत्य कळले होते..

गरिमा जो विचार करत होती त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने वारे वाहत होते..

या केसचा अभ्यास करताना.. गरिमा त्याला माहिती पुरविताना तिची अस्वस्थता पाहून संजयच्याही नकळत त्याच्या मनात गरिमाबद्दल सहानुभूती निर्माण झाली होती..



हे अकल्पित तिच्यासमोर आल्यावर तिची काय अवस्था होईल.. तिची प्रतिक्रिया काय असेल.. असा विचार अगदी काही क्षण संजयच्या मनात डोकावून गेला..

बरेच पुरावे गोळा करून इनविन्सीबल गुप्तहेर संस्थेने माझ्या हाती सुपूर्त केले..

ते पुरावे पाहिले नसते तर मी या गोष्टीवर विश्वास ठेवला नसता.. माझ्या मनाने कधीही ते सत्य पुराव्यांखेरीज स्वीकारले नसते..

त्याने जे सांगितले ते ऐकून तसेच वरुण आणि तन्मयचे फोटो पाहून माझ्यावर आभाळ कोसळले..

मी त्या असह्य वेदनेच्या.. फसवुणुकीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेले..”



प्रकरण ९

“तन्मय, आपला समाज अजूनही मान्य करू शकत नसलेल्या.. सामाजिक जीवनाच्या परिभाषेत बसत नसणाऱ्या चालीरितींचा अवलंब करत असल्याचे गुप्तहेर संजयने गोळा केलेल्या पुराव्यांनी सिद्ध केले होते..”

“तो समलिंगी होता.. आणि त्याने ते सत्य माझ्यापासून लपवून ठेवले होते..”

“आपल्यापासून ही गोष्ट लपवून त्याने आपल्याला आणि आपल्या घरच्यांना फसवल्याची भावना जगणे असह्य करत होती..”

“समाजात आपली प्रतिमा जपण्याकरिता माणूस सतत धडपडत असतो.. तन्मयने देखिल समाजात ताठ मानेने जगण्यासाठी हा लग्नाचा घाट घातला होता..”

“समाजात ताठ मानेने वावरून.. त्याला आपले बंद कुपीतील.. समाजमान्य नसलेले आयुष्यही जगता येत होते..”



“हे सर्व कळल्यावर माझी या नात्यात घुसमट होत होती..”

“सर्व मुलींची असतात तशी माझीही लग्नाबद्दलची आपली स्वप्ने होती..”

“बाबांच्या ओळखीच्या आपटे काकांच्या वधु-वर मंडळात बाबांनी माझे नाव नोंदविले..”

“मला खरेतर महाविद्यालयीन शिक्षणा दरम्यान आजूबाजूला जोडपी बघून आपणही प्रेमात पडावे आणि प्रेमविवाह करावा असे वाटत होते.. पण तसा कधी योग आला नाही..”

“आपटे काकांच्या वधुवर मंडळातून तन्मय अभ्यंकरचे स्थळ सांगून आले..”

“बाबांनी पत्रिका जुळवून पहिल्या.. २७ गुण जुळत होते..”

“त्यानंतर त्यांनी व्यवस्थित त्याच्या कुटुंबाची माहिती.. त्याच्या ऑफिस.. त्याच्या एकंदरीत तेथील वागणुकीविषयी माहिती काढली..”



“एकंदरीत काय तर कसलाही वाईट अभिप्राय माझ्या घरच्यांना मिळाला नव्हता..”

“तन्मय अभ्यंकर..   उंचपुरा.. थोडासा सावळा.. पहिल्या भेटीमध्ये मला तन्मय सामाजिक शिष्टाचार सांभाळून वागणारा वाटला..”

“त्यानंतर मी आणि तन्मय जवळ जवळ ५ ते ७ वेळा भेटलो..”

“मला त्या भेटींमधे तन्मयमध्ये वेगळे किंवा वावगे म्हणावे असे काही जाणवले नाही..”

“किती प्रयत्न केला असेल त्याने मला त्या काळात तसे न जाणवू देण्याचा हे आज कळते आहे..”

“त्यानंतर माझे आणि तन्मयचे लग्न वैदिक पद्धतीने थाटामाटात पार पडले..”



प्रकरण १०

“नवीन घरात.. नवीन माणसांत आणि तन्मयच्या आयुष्यात मी प्रवेश केला होता..”

“नवीन स्वप्ने.. नवीन नाती.. आयुष्याच्या नवीन वळणावरची हुरहूर.. उत्साह.. यामध्ये १५ दिवस कसे निघून गेले कळलेच नाही..”

“तन्मयचे वागणे मधुचंद्राच्या काळात थोडे खटकले..”

“तो मला हवा तितका आनंदी.. उत्साही कधीच वाटला नाही.. सतत फोनवर.. सतत कुठेतरी हरवलेला आणि एकदाही लग्नाच्या नात्याला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न त्याच्या कडून झाला नाही..”

“पण नवीन नात्याशी जुळवून घ्यायला वेळ लागत असेल असा विचार करून मी काही फार खोलात जाऊन विषयाला हात घातला नाही..”

“पण त्याचे नंतरही वागणे फार बदलले नाही.. मला कळत नव्हते की माझे काय चुकते आहे.. मी कुठे कमी पडते आहे..”

“मी तन्मयजवळ हा विषय काढण्याचा बऱ्याचदा प्रयत्नही केला.. पण हाती काहीच लागले नाही.. त्याने प्रत्येक वेळेस सराईतपणे तो विषय टाळला..”

“इतर कोणाला तर विचारण्याची सोयच नव्हती..”

“हे सत्र बराच काळ असेच चालू होते..”

“मी माझ्या परीने सारे प्रयत्न करूनही तन्मयकडून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता..”

“हळूहळू माझ्या संयमाचा जो बांध होता त्याला तडे जायला सुरुवात झाली होती..”



“तो फुटण्याची वेळ जवळ येत आहे असे माझे अंतर्मन सांगत होते.. काहीतरी विपरीत दिशेने या सगळया घटनाक्रमाची वाटचाल होत आहे कि काय असे सतत राहून राहून वाटत होते..”

“माझी स्वप्ने लग्नानंतरच्या काही महिन्यांच्या काळातच धुळीला मिळाली होती..”

“चिडचिड.. तडफड.. त्रागा.. घुसमट.. होत होती.. या साऱ्या भावना वारंवार मनाला भेटी देत होत्या..”

“फसवणुकीचा सल मनात घेऊन मी जगत होते..”

“ना कोणाला सांगता येत होते ना मनात ठेवता येत होते..”

“घरच्यांना तरी कोणत्या तोंडाने आणि काय सांगायचे असा प्रश्न मला पडला होता..”

"त्यांनी आपल्या लेकीचे लग्न मोठया आशेने आपल्या तोलामोलाच्या घराण्यात करून दिले होते..  मुलगी उच्चशिक्षित असल्याने मुलगाही तसाच शोधला होता.."

"सर्वच मुलींच्या घरचे करतात तसे तन्मय आणि एकंदरीतच अभ्यंकर कुटुंब पार्श्वभूमीविषयी पडताळा माझ्याही घरच्यांनी केला होते.. त्यात माझ्या घरच्यांना कसलाही वाईट अभिप्राय मिळाला नव्हता.."

"आता जर सत्यपरिस्थिती त्यांच्या लक्षात आली तर माझ्या या दशेला ते स्वतःला जबाबदार धरतील आणि कदाचित आयुष्यभर स्वतःला दोष देत राहतील.."

प्रकरण ११

“डोक्यात सतत तोच विषय आणि तिच विचारचक्रे फिरत असल्याने माझ्या मनातील असूयेची भावना वारंवार उफाळून येत होती..”

“गोष्टी हाताबाहेर जाण्याआधी काहीतरी पाऊल उचलण्याची गरज मला भासत होती..”

“मी संसार चालवण्यासाठी माझ्या परीने बरेच प्रयत्न केले होते..”

“तन्मयला समजून घेण्याचा.. गोष्टी त्याच्या कलाने घेण्याचा मी भरपूर प्रयत्न केला..”

“पण सगळे निष्फळ ठरले..”

“आता संसार वाचवण्यासाठीचा शेवटचा उपाय म्हणून मी तन्मयला समुपदेशकाची मदत घेण्याकरीता विचारले.. पण तो त्यासाठीही तयार नव्हता..”



त्याला आपली बंद कुपीतील बाजू कोणासमोरच आणण्यात स्वारस्य नव्हते.. अगदी समुपदेशकासमोरही..

“आता मात्र माझ्या संयमाचा बांध फुटला होता.. आणि माझे माझ्या वागण्यावरचे नियंत्रण वरचेवर कमी होत गेले..”

“चिडचिड.. त्रागा.. घुसमट.. हतबलता या व अशाच तत्सम भावनांनी साचून साचून असूयेचे रूप कधी धारण केले हे कळले देखील नाही..”

“माझ्या मनातील असूया.. सूडभावना दिवसेंदिवस अधिकाधिक रौद्र रूप धारण करू लागली होती..”

“मला तन्मयचा मानसिक छळ करण्यात मनस्वी सुख मिळू लागले होते..”

“मी सतत त्याला समाजातील त्याची प्रतिमा मलिन करण्याची धमकीवजा चेतावणी देत होते..”



“त्याच्या आई - बाबांना सांगायची तर सोयच नव्हती.. त्यांची अवस्था काय होईल या विचारानेच मला धडकी भरत होती..”

“पण तरीही मी तन्मयला मानसिक त्रास द्यायला.. ओशाळवायला तशी धमकी देत होते.. त्याच्या आई वडिलांच्या कानांवर योग्य वेळी या गोष्टी मी घालणार असल्याचे सतत त्याच्या मनावर बिंबवत होते..”

“तन्मयची मानसिक अवस्था दिवसेंदिवस खराब होत चालली होती.. तो कोषात चालला होता..”

“सतत त्याला त्याच्या वेगळे असण्याची जाणीव करून देत होते मी.. तो कसा सामाजिक चौकटीच्या बाहेरचा आहे.. कसा तो माझ्या आयुष्याच्या सद्यस्थितीला कारणीभूत आहे..”

“जर लोकांना या गोष्टी समजल्या तर समाजात कशी त्याची छी थू होईल या गोष्टी आवेशाच्या भरात मी त्याच्या मनावर बिंबवत राहिले..”

“वारंवार होणारे आघात तन्मयच्या जिव्हारी लागत होते..”

“माझ्या मनाची सध्याची अवस्था फारच वेगळी होती.. ते माझेच मन आहे का.. आणि आपण अशा विचारांच्या आहारी का गेलो.. हे सर्व विचार डोक्यात चालू असायचे..”

“कधीही कोणाच्या वाटेला ना जाणारी मी.. कोणालाही आपल्यामुळे कसलाच त्रास होऊ नये म्हणून प्रयत्नशील असलेली मी खरी की आत्ताची मी खरी..”

“पण सत्य या घडीला हेच होते की मला या गोष्टींमधे मानसिक समाधान मिळू लागले होते..”

“तन्मयने त्याचा मित्र वरुण याला या सर्व गोष्टींची कल्पना देऊन ठेवली होती..”

“तन्मय निराशेच्या गर्तेत पुरता बुडून गेला होता.. त्याची घरात पाऊल ठेवण्याची अजिबात इच्छा नसायची..”



“या सर्वांवर एक उपाय म्हणून त्याने मला एके दिवशी घटस्फोटाचा विचार करण्याचा सल्ला दिला..”

“त्यादिवशी तर माझी तळपायाची आग मस्तकालाच गेली.. चोर तो चोर वर शिरजोर..”

“लग्न म्हणजे काय खेळ वाटला का याला.. कधीही जोडावे आणि कधीही तोडावे..”

“लग्नसंस्थेचे पावित्र्य, मांगल्य इतके तकलादू करून टाकावे या लोकांनी.. विचारानेच मला डोक्यात असह्य वेदना जाणवू लागल्या..”

“कोणालातरी फसवून ही माणसे स्वतःला आरशात पाहू कसे शकतात.. देव जाणो..”

“तन्मयला घटस्फोट हवा होता.. पण माझ्या आयुष्याची राख रांगोळी करून मी बरी त्याला मोकळे होऊ देईन..”





"ना मी त्याला घटस्फोट द्यायला तयार होते.. ना मोकळेपणाने जगू द्यायला.."

"चांगले-वाईट, बरोबर-चूक या सर्वांच्या पलीकडे जाऊन मी वागत होते.. या काळात सूडभावनेने माझ्या बुद्धीवर पुरते वैचारिक वर्चस्व गाजविले होते.."

"आणि होत्याचे नव्हते झाले होते.."

"तन्मयला मी मानसिक दृष्ट्या एवढे छळले की तो दिवसेंदिवस मानसिकदृष्ट्या कमकुवत.. दुर्बल होत गेला.."

"त्याने या मानसिक दुर्बलतेला कवटाळुन आणि प्रतिष्ठित समाजातील आपली प्रतिमा मलिन होण्याच्या भीतीने आत्महत्या केली.."



प्रकरण १२

“आत्महत्त्या.. हा हा हा..” करत गरिमा बराच वेळ खूपच विकृतपणे हसत राहिली..

गरिमाच्या विकृत हसण्याने प्रत्येक सेकंदागणिक आणखीनच रौद्र रूप धारण केले..

“वरुणच्या कानावर तन्मयच्या आत्महत्त्येची बातमी पडली..”

“गेले जवळ जवळ पाच वर्षे ते एकमेकांना ओळखत होते.. त्याच्या अश्या अचानक जाण्याने वरुण फार खचून गेला होता..”

“भावनिक प्रलय दाटून येऊन फारच दयनीय स्थिती झाली होती त्याची..”

“स्वतःला कसेबसे सावरून त्याने पोलीस ठाणे गाठले..”



"माझ्या आणि तन्मयच्या नात्यातील दुराव्याची कल्पना त्याला होती.."

"त्याने पोलिसांना तसे सविस्तर सांगितले.. आणि या सर्व प्रकाराला कशी मीच जबाबदार असल्याचे सांगितले.."

"वरुणने जे सांगितले ते मला पोलिसांकडून कळले.. माझी बाजू जाणून घेण्यासाठी आणि या सर्व गोष्टींची सत्यता पडताळून पाहण्यासाठी मला पोलीस ठाण्यात नेण्यात आले.."

"वरुणने त्याच्या डोक्यातील विचार.. त्याचा माझ्यावर संशय घेण्याचे कारण पोलिसांच्या निदर्शनास आणून दिले.."

"वरुणच्या म्हणण्यानुसार तन्मयला गरिमाच्या वागण्याचा खूप त्रास होत होता.. तो दररोज लहान मुलाप्रमाणे माझ्या जवळ रडत होता.."

तन्मयने वरुणला सांगितले की त्याने तिच्याशी लग्न करून तिचे आणि ओघाने स्वतःचे आयुष्याचेही वाटोळे करून घेतले आहे.. त्याला खूप पश्चाताप होतो आहे..



गरीमाला त्याने घटस्फोटाचाही विचार करण्यास सांगितले..

पण ती फारच दुखावली गेली असल्याने काहीच ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हती..

तन्मयला त्या परिस्थितीतून काहीच मार्ग सापडत नव्हता..  तो पार खचून गेला होता.. त्याला वाटत होते कि माझी आणि गरिमाची जी ससेहोलपट होते आहे त्याला सर्वस्वी तोच जबाबदार आहे..

त्यामुळे त्याला सगळेच नकोसे झाले होते.. देवाने बोलावले तर सुटेल यातून असे काहीबाही बोलत होता मागच्या आठवड्यामध्ये..

हा तिढा कसा सोडवायचा याचा तो शेवटपर्यंत विचार करत होता..

त्याला पश्चाताप होऊनही आता काही उपयोग नव्हता असे त्याला वाटत होते..



गरीमा येन केन प्रकारेन त्याचा मानसिक छळ करत राहिली..

अलीकडे तर तिला दारूचे व्यसनही जडले होते..  बऱ्याचदा ती शुद्ध हरपलेल्या अवस्थेत रात्री उशिरा घरी यायची..

एकदा तर कोणी इसम तिला घरापर्यंत सोडायला आला होता.. ती पूर्णपणे मद्यधुंद अवस्थेत होती.. तिला कशाचेही भान राहिले नव्हते..

सध्या ती अगदी बेताल वागत होती..

ती फक्त एका बाजूने विचार करत होती आणि असूयेने पेटलेली होती..

प्रकरण १३

“वरुणने दिलेल्या या तन्मयच्या बाजूच्या इतिवृत्तांता नंतर माझी कसून चौकशी करण्यात आली..”

“कारण घटना घडली तेव्हा मीच घरात होते.. मी आधीच पोलिसांना कळवले होते.. रडणे तर आवरतच नव्हते..  आणि सगळयात महत्वाचे म्हणजे ते आवरून चालणारही नव्हतें.. त्याची विदारकता त्याक्षणी पोलिसांच्या कानी पडणे फार गरजेचे होते..”

मी त्यांना जे घडले ते सविस्तर सांगितले..

“मी सकाळी झोपेतून उठून पाहिले तर तन्मय पलंगावर नव्हता..  मला थोडे आश्चर्यच वाटले.. कारण फार कमीवेळा तो माझ्या आधी उठत असे.. त्याला चहा दिल्यावर तो पिऊनच तन्मय पलंगावरुन खाली उतरत असे..”



“मी उठले आणि त्याला शोधू लागले..  तो मला दिवाणखान्यामध्ये निपचित पडलेला आढळून आला..  तन्मयला गारवा सहन होत नसे..

मला वाटले की आमचा शयनकक्ष फार थंड पडत असे.. कदाचित थंडीमुळे तन्मयला आत झोप लागली नसेल म्हणून तो बाहेर येऊन झोपला असेल..”

“नेहमीप्रमाणे चहा करून त्याला उठवू या असा विचार करून मी माझे आवरले.. दरवाजा उघडून दुधाच्या पिशव्या आत घेतल्या आणि आपल्याच तंद्रीत चहा करण्यासाठी स्वयंपाकघरात शिरले.. चहा बनवला आणि त्याला देण्यास गेले..

“पण त्याची अवस्था पाहून मी तिथेच चक्कर येऊन पडले..”

“थोड्या वेळाने मला जाग आली तर मीनाक्षी ताई.. इतर शेजार पाजारचे जमा झाले होते..”

“तन्मयच्या तोंडाला आलेला फेस पाहून मी घाबरून गेले.. हात पाय लटलट कापू लागले.. आणि चक्कर येऊन पडले.. चहाचा कप हातातून पडून फुटला होता.. जमिनीवर चहा सांडला होता.. काचांचे तुकडे पसरले होते..”

“मला काय करावे काही सुचत नव्हते.. खरे काय.. खोटे काय काहीच कळत नव्हते.. डोके बधिर झाले होते..”

“शेजारच्या मीनाक्षी ताईंच्या मिस्टरांनी पोलिसांना आणि ऍम्बुलन्सला फोन केला..”

“मला धक्क्यातून.. त्या आघातातून सावरायला आणि बोलणे सुरु करायला जवळ जवळ २४ तास लागले..”

प्रकरण १४

“सावरायला..  हा हा हा..”

“मी धक्क्यातून सावरल्यावर पोलिसांना माझे स्टेटमेंट देऊ शकले..”

“मी सूडभावनेने पेटलेली असल्याने जे काही घडले ते योग्यच असे समजून माझी बाजू ठामपणे मांडू शकले..”

“कोणीच मला दोषी सिद्ध करू शकत नव्हते कारण ती आत्महत्त्या होती हे पुराव्यांनिशी सिद्ध झाले होते..”

“अश्या प्रकारे वरुणने संशयित म्हणून माझे नाव घेऊनही न्यायालयाने माझी पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली..”

आपल्याच विचारात मग्न होती गरिमा..

तितक्यात गरिमाच्या खांद्यावर मागून अलगद एक हात आला..

गरीमा आपल्याच विचारात असल्याने ती त्या अचानक झालेल्या स्पर्शाने दचकली.. का कोण जाणे पण त्या कोर्टरूम बाहेर दिसलेल्या सावलीची तिला आठवण झाली..

आणि खरेच गरीमाला कोर्टरूमच्या दरवाज्यात दिसली होती तशी सावली आपल्या दिशेने येताना दिसली..  मध्यंतरी थोडया काळापुरता तिला त्या घटनेचा विसर पडला होता..

तसे ती स्वप्नातून जागी झाल्यासारखी.. अचानक चक्रीवादळातुन बाहेर आल्या प्रमाणे एक क्षण दचकली..

आरामखुर्चीवर हेलकावे घेत घेत गरिमा आटपाटनगराच्या भूतकाळातून.. हळूहळू वर्तमानकाळात परतली..

गरीमा बसलेल्या आरामखुर्चीच्या दिशने ती सावली सरकत होती.. तिची हेलकावणारी खुर्ची जागीच थांबली.. ती डोळयाच्या कोपऱ्यातून अंदाज घेण्याचा प्रयत्न करत होती.. पण तिला काही नीट दिसले नाही..



गरिमाचे हातपाय भीतीने जागीच थिजल्यासारखे झाले..

ती सावली अगदी खुर्चीला टेकायला आली आहे असे वाटून ती तडक खुर्चीवरून उठली.. तिला दरदरून घाम फुटला होता..

आणि ती जोरात किंचाळली..



प्रकरण १५

गरिमाने कसे तरी अंगातील सारे बळ एकवटले.. आणि हिंमत करून मागे वळून पाहिले..

गरीमाची ती अवस्था पाहून दोघेही हसत होते..

पण गरिमा खूप घाबरलेली..

आणि सध्या ती त्या दोघांना एकत्र पाहून संभ्रमात होती.. गरीमाला काहीच कळत नव्हते की हे दोघे सोबत कसे..

ते दोघे मित्र होते.. आणि इनविन्सीबल गुप्तहेर संस्थेत एकत्र काम करत होते..

मकरंद आणि संजय सोबत होते..



“अगं केवढी घाबरली आहेस.. म्हटले थोडी गंमत करावी तुझी..”मकरंद

गरीमा मात्र चिडलेली होती.. तिला हि मस्करी अजिबात आवडलेली नव्हती..

गरीमाने स्वतःला कसेबसे सावरले.. समोर ठेवलेल्या ग्लासमधील पाणी ती गटागटा प्यायली..

मग मनातील प्रश्नांची मकरंदवर सरबत्ती सुरु केली..

मकरंदने तिला तो देखील इनविन्सीबल गुप्तहेर संस्थेत काम करत असल्याचे सांगितले.. आणि संजय त्याचा मित्र असल्याचे सांगितले..

मकरंदच्या सांगण्यावरूनच तो न्यायालयाजवळ या केसभोवती घडत असलेल्या गोष्टींची इतंभूत माहिती ठेवण्याकरिता वेषांतर करून पाळत ठेवून असायचा..

गरिमा आणि मकरंद मध्ये त्यांच्या कामाविषयी कधीच चर्चा झाली नव्हती.. म्हणून तिला हे माहीत देखील नव्हते..



जग लहान आहे म्हणतात ते काही खोटे नाही.. कोणाशी कुठे आणि कुठल्या ठिकाणी गाठ पडेल सांगता येत नाही..

गरीमाला एवढे सगळे योगायोग खरेतर पचवायला फार जड जात होते.. पण आता ती बऱ्यापैकी सावरली होती..

गरिमा, मकरंद आणि संजयने मिळून त्यांनी आखणी केल्याप्रमाणे घडवून आणलेली योजना सफल झाल्याचा विजयोत्सव साजरा केला.. अर्थातच मदिराप्राशनाने हे काही वेगळे सांगावयास नको.. तिच्यामुळेच तर मकरंद आणि गरिमा यांचे ऋणानुबंध जोडले गेले होते..

संजयने थोडा लवकरच त्या दोघांचा निरोप घेतला..



प्रकरण १६

संजय गेल्यानांतरही मकरंद आणि गरिमा बराच वेळ गॅलरी मध्ये गप्पा मारत बसले होते.. गरिमाला मोकळया हवेत आणि आरामखुर्चीवरून उठावेसेच वाटत नव्हते..

मस्त चंद्रप्रकाश.. मंद वारा.. आकाशाला असलेली चांदण्यांची लकाकी.. झाडांची सळसळ.. सोबत मदिरा आणि मनमोकळया गप्पा मारायला मकरंद.. या घडीला आणखी काय हवे असणार तिला..

त्या आल्हाददायक वातावरणाचा आस्वाद घेण्यात दोघेही रममाण झाले होते..

तेवढ्यात या साऱ्या आल्हाददायक वातावरणाला छेद देत आकाशातून एक टिटवी ओरडत गेली.. अशा ऑड वेळीच्या तिच्या ओरडण्याने काही क्षण दोघांचे लक्ष तिने वेधून घेतले..

परत गरिमा तिच्या खुर्चीला हेलकावे देऊ लागली..

न्यायालयातील कटाक्षाची उजळणी करत गरिमा मकरंदकडे पाहू लागते..

मकरंद पण खूप खुश होता.. त्याच्या मार्गातील मोठा अडथळा दूर झाला होता आणि तो त्याच्या मनातील गोष्ट परत नव्याने गरीमासमोर मांडू शकणार होता..

दोघेही वेगवेगळया कारणासाठी भावनेच्या एकाच हिंदोळयावर बराच काळ झुलत होते..

मधेच मकरंद आणि गरिमा यांची नजरा - नजर होऊन दोघांमधे जग जिंकल्याच्या आविर्भावात विकृत हसण्याची जणू शर्यतच सुरू झाली..

मकरंद आणि गरिमा यांनी अगदी शिस्तबद्ध पद्धतीने डाव आखून तन्मयचा काटा काढला होता..

गरीमाची असूया आणि मकरंदचे तिच्यावर असलेले एकतर्फी प्रेम.. आणि ते मिळवण्यासाठी काहीही करण्याची असलेली त्याची तयारी या घटकांनी मिळून शिजला होता तन्मयच्या हत्येचा कट..

टीव्हीवर लागणाऱ्या धारावाहिकाच्या एका भागात दाखवलेल्या एका युक्तीचा त्यांनी वापर केला होता..

त्या धारावाहिकात गळयाच्या नसेत कसलेसे इंजेकशन देऊन व्यक्तीला मारले जाते.. आणि शवविच्छेदनामधे मृत्यूच्या कारणाचा कसलाही सुगावा लागत नाही..

अगदी याच पद्धतीचे अनुकरण करून त्यांनी तन्मयला या जगातून हद्दपार केले होते..

गरिमा आपल्याच गुर्मीत.. जिंकल्याच्या नशेत बेधुंद होती..

मकरंदला हीच संधी योग्य वाटली होती तिला आपल्या मनातील गोष्टीचे उत्तर विचारायला..

गरिमाने आपल्याला या कटात सामील करून घेण्यासाठी.. आपल्याला दिलेले वचन पाळावे एवढेच त्याला वाटत होते..



प्रकरण १७

त्याकाळात सततच्या मानसिक तणावामुळे गरिमा असुयेच्या आहारी जाऊ लागली होती..

गरीमाच्या असूयेने एवढे रौद्र रूप धारण केले होते की तिला दररोज अस्वस्थ वाटत असे..

घरात एकटी बसून ते विचार अजून जास्तच तिच्या अवती भोवती रिंगण घालत असत.. आणि मग ती बऱ्याचदा डिप्रेशनच्या आहारी जात असे..

यावर कायमचा तोडगा निघेपर्यंत तात्पुरता उपाय शोधणे गरीमाला गरजेचे वाटत होते..

घरी जाऊन तरी काय करणार असा विचार करत करतच एके दिवशी तिची पाऊले तिच्या नकळतच घराजवळच असलेल्या पॅराडाईज बारकडे वळली..

ती पीत नव्हती.. पण तिथे तिचा वेळ जात होता.. ती पहिले ७-८ दिवस फक्त तेथील गर्दीला न्याहाळत बसायची..

तिथे तिला निरनिराळ्या प्रकारचे मद्यपी दिसत होते..

परिस्थितीने गांजलेले, थकलेले चेहरे घेऊन आलेले.. प्रेमभंगानंतर वेदना लपविण्यासाठी आलेले.. नुकतीच प्रेमात पडलेली, आनंद लुटण्यात मनसोक्त रमलेली तरुणाई.. ऑफिसच्या पार्टीच्या निमित्ताने एकत्र घोळक्यात आलेले ऑफिस कर्मचारी.. बिजनेस वाढविण्याच्या उद्देशाने क्लायंटना घेऊन आलेले उद्योगपती..

त्यांना मनसोक्त मजा करताना पाहत होती गरिमा..

मद्यधुंद अवस्थेत संगीताच्या तालावर वेगवेगळ्या वर्गातील लोक बेधुंद होऊन थिरकत होते..

गरिमा प्रत्येक व्यक्तीच्या एकाच तालावरच्या वैविध्यपूर्ण ठेक्यांचे स्तिमित होऊन निरीक्षण करत होती..

हे तिचे दररोजचे झाले होते.. ऑफिस सुटल्यानंतर थेट घरी न जाता ती बराचवेळ पॅराडाईज बार मधे बसत असे..

वैयक्तिक आयुष्यातील त्रास.. त्रागा.. घुसमट आणि आजूबाजूच्या वातावरणामुळे हळूहळू ती मद्यपानाच्या आहारी जाऊ लागली..

मद्यपान करणे हा देखील हळूहळू तिच्या दैनंदिनीचा भाग झाला..

प्रकरण १८

गरीमा वरचेवर जास्तच मद्यपान करू लागली होती..

व्यसन एवढे बळावले होते की घरी निघताना ती बऱ्याचदा शुद्धीत नसायची..

जेवढा वेळ ती बेशुद्ध असायची.. फक्त तेवढाच वेळ ती त्रास.. त्रागा.. घुसमट या भावनांपासून अलिप्त असायची.. नाहीतर वैयक्तिक आयुष्यातील या भावना सतत तिच्या मानगुटीवर स्वार असायच्या..

याच कारणामुळे ती मद्यरूपी विषाला.. सद्यस्थितित तात्पुरते अमृत समजत होती..

या सो कॉल्ड अमृतामुळेच तिच्या आणि वरुणच्या घरातील ऑकवर्ड संभाषणांना हल्ली स्वल्पविराम मिळत होता..

एकदा ती अश्याच मद्यधुंद अवस्थेत घरी जाण्यास निघाली असताना पॅराडाइज बारच्या एक्सिट जवळ अडखळून पडता पडता वाचते..

मद्यधुंद अवस्थेत बडबडत होती..

बाहेरून आत येण्याच्या प्रयत्न करत असलेल्या अनोळखी व्यक्ती तिला अडखळलेली पाहते..

“तन्मय तू हे बरोबर केले नाहीस.. मी तुला कधीच माफ करणार नाही..” असे काहीसे अस्पष्ट पुटपुटतच उरली सुरली शुद्ध हरपून गरिमा खाली कोसळत असताना ती व्यक्ती तिला सावरते..

गरीमाची पर्स खाली पडते.. पर्समधील सगळे सामान जमिनीवर अस्ताव्यस्त विखुरले जाते..

गरिमा संपूर्ण बेशुद्ध अवस्थेत त्या व्यक्तीच्या हातावर विसावलेली होती.. त्या व्यक्तीने तिला सावरले..

गरीमाला सावरत असताना तिच्या निरागस चेहऱ्याकडे त्याचे लक्ष गेले..



अतिशय रेखीव चेहरा..  ती बेशुद्ध होण्यापूर्वी अगदी दोनच क्षण दिसलेले तिचे निळेशार डोळे.. थोडीशी तपकिरी छटा ल्यालेले तिचे लांबसडक रेशमी केस.. नितळ कांती.. परफ्युमचा सुगंध या साऱ्याने ती व्यक्ती काही क्षण हरखून गेली होती..

काही वेळाने भानावर येत गरिमाला कारमध्ये बसवून ती व्यक्ती तिची जमिनीवर पडलेली पर्स उचलते..

त्यातील सर्व सामान भरत असताना त्या व्यक्तीला गरीमाचे लायसन्स दिसते..

त्याला नाव दिसते.. गरिमा त. अभ्यंकर..  त्यावर पत्ता होता..

ती व्यक्ती त्याच एरियातिल असल्याने त्याला घर शोधायला फार कसरत करावी लागली नाही..

त्या व्यक्तीने बेल वाजवली.. तन्मयने दार उघडले..

तिला सोफ्यावर झोपवून ती व्यक्ती निघून गेली..

तन्मयने तिच्या अंगावर पांघरूण आणून टाकले..

केविलवाण्या परिस्थितीत शुद्ध हरपलेल्या गरीमाला पाहून त्याला फार त्रास झाला..

तन्मय नकळतच भूतकाळाशी जोडला गेला..

प्रकरण १९

तन्मयला शाळेतील ते दिवस आठवले.. तो नुकताच पौगंडावस्थेत येण्याचे दिवस आठवले..

तन्मयच्या मित्रांच्या अवस्थेमधे आणि त्याच्या अवस्थेमधे त्याला काहीही साधर्म्य जाणवत नव्हते..

त्याच्या मित्रांना मुलींबद्दल उमलत्या वयाप्रमाणे आकर्षण वाटू लागले होते.. कोण कशी छान आहे अश्या त्यांच्या चर्चा रंगत असत..

तन्मयला मात्र मुलींपेक्षाही मुलांच्या हालचाली टिपण्यात रस वाटत होता.. मुलींकडे पाहण्यात त्याला कधीही स्वारस्य नसे..

त्याला सुरुवातीला कळतच नव्हते की त्याच्या आणि त्याच्या मित्रांच्या वागणुकीमध्ये असा फरक का असावा..

हळूहळू वय वाढले तसे तन्मयच्या लक्षात येऊ लागले की तो समलिंगी आहे.. ते जसजसे त्याच्या लक्षात येत गेले तसतसा हळूहळू त्याने आपला समाजातील वावर कमी करायला सुरुवात केली.. त्याच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला.. त्याला सतत भीती होती की समाज आपल्या या अवस्थेला कसा स्वीकारू शकेल..

खरे पाहता हे सगळे नैसर्गिक आहे..  मी काही स्वतःहून मागून घेतलेले नाही.. पण समाज हे समजूतदारपणे घेईलच असे नाही.. असाच स्वतःच्या वेगळेपणाच्या दडपणाखाली त्याने स्वतःला सगळयांपासून लांबच ठेवले..

तसेच त्याने शिक्षण पूर्ण केले.. नोकरी मिळवली..

नोकरीच्या ठिकाणी हळूहळू तन्मयची वरुण नावाच्या सहकर्मचाऱ्याशी ओळख झाली.. हळूहळू त्यांच्या ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाले..

हळूहळू तन्मय आणि वरुणला एकमेकांच्या सारखे असल्याची जाणीव झाली.. वरुणचाहि कल समलैंगिक वर्तनाकडे होता..



अशा प्रकारे तन्मयने वर्षनुवर्षे समाजापासून लपवून ठेवलेल्या सुप्त भावना व्यक्त होण्यासाठी जागा मिळाली होती..

हळूहळू त्यांचे सूर जुळले आणि मग गाठी भेटी नेहमीच्याच झाल्या..

तन्मयला डुलकी लागली तसा तो वर्तमानकाळात परत आला.. आणि उठून शयनकक्षाकडे गेला..

गरिमा सकाळ पर्यंत तशीच सोफ्यावर झोपून होती..

तन्मयचे सकाळी ऑफिसला जाताना सोफ्याकडे परत लक्ष गेले..

तिची ती अवस्था बघून आपण हे काय करून बसलो.. एका चांगल्या मुलीच्या आयुष्याची.. तिच्या स्वप्नांची विल्हेवाट लावली.. या विचारांतच.. बोचरी सल घेऊन तो घराबाहेर पडला..

प्रकरण २०

गरीमाला सकाळी जाग आली..

आपण घरी कधी आलो आणि सोफ्यावर का झोपलो याची तिला काही लिंक लागेना..

तिचे डोके जड झाले होते.. तिने उठून लिंबू पाणी प्यायले..

तन्मय एक महत्वाची फाईल घरी विसरला होता.. ती नेण्यासाठी तो लॅच उघडून आत आला..

गरिमा आणि तो समोरासमोर आले.. वातावरणात औकवर्डनेस भरून गेला.. तन्मय फाईल घेऊन गरीमाची नजर चुकवत घरातून बाहेर पडला..

गरीमाची अशीच दैनंदिनी चालू होती.. घर-ऑफिस-पॅराडाईज बार-घर..

पॅराडाईज बार मधे तिच्या हल्ली हल्ली लक्षात येत होते की तिला कोणीतरी तिला एकटक न्याहाळत असते..

हे न्याहाळण्याचे सत्र जवळ जवळ ७-८ दिवस सुरु होते.. तिने पहिले ७-८ दिवस दुर्लक्ष केले..

पण तिला सहन न होऊन नवव्या दिवशी हिम्मत करून तिने त्या व्यक्तीला त्याच्या जवळ जाऊन विचारलेच कि काय प्रकार आहे..

त्या व्यक्तीने म्हणजेच मकरंदने काही दिवसांपूर्वीच्या प्रसंगाबद्दल गरीमाला सांगतले.. जेव्हा ती पॅराडाईज बारच्या एक्सिटजवळ तोल जाऊन पडली होती.. आणि त्यानेच तिला घरी सोडले होते..

आता गरीमाला ती त्यादिवशी घरी कशी आली याची लिंक लागली.. आणि ती खूप ओशाळली..

अश्या प्रकारे गरिमा आणि मकरंदच्या मैत्रीची सुरुवात झाली..

त्यांच्या भेटी वाढत गेल्या.. दोघेही तासन तास बारमधे गप्पा मारत बसत..

हळूहळू मकरंद गरीमाच्या व्यक्तिमत्वाच्या आणखीनच प्रेमात पडत होता.. पॅराडाईज बारच्या एक्सिट जवळ तिला सावरतानाच त्याला मंत्रमुग्ध झाल्या सारखे वाटत होते..

गरिमा मात्र त्याला फक्त आपला एक चांगला मित्र समजत होती..

मकरंदने तिला एके दिवशी प्रपोजही केले..

मकरंदचा वाढदिवस होता आज.. आणि उद्या शनिवार असल्याने गरीमाने शक्य तितक्या उशिरापर्यंत बारमधेच थांबण्याचे ठरविले होते..

नेहमीच्या वेळी दोघेही पॅराडाईज बारमधे भेटले..

आज मकरंद ट्रीट देणार होता.. तो नेहमीप्रमाणे त्या दोघांचे ठरलेले ड्रिंक्स घेऊन बार कॉउंटरवरून निघाला.. मधेच काहीतरी आठवून थबकला..

त्याने खिशातून काहीतरी काढून त्याने ग्लास मध्ये अलगद सोडले..

काय होते मनात मकरंदच्या.. ?



प्रकरण २१

मकरंद ड्रिंक्स घेऊन गरिमा बसलेल्या टेबल जवळ आला..

४-५ सेकंद तो तिच्याकडे बघत तसाच उभा होता.. तिच्या लोभसवाण्या रूपाच्या वलयात मकरंद पुरता गुरफटला होता..

गरिमा फोन बघण्यात व्यस्त असल्यामुळे तिचे लवकर लक्ष गेले नाही..

थोड्या वेळाने तिने वर पाहिले तरी मकरंद उभाच होता..

"कुठे हरवला आहेत राजेसाहेब.. वाढदिवस ना आपला.. बोला आपणांस काय भेट हवी आहे.." गरिमा

मकरंदला तिच्या अशा मधेच राजेशाही तोऱ्यात बोलण्याच्या लकबीचे हसू आले..



"घाई काय आहे.. राजेसाहेबांना जी भेट हवी आहे ती देणे केवळ आपणांसच शक्य आहे.... कळेलच काय आहे ते.. तूर्तास तरी आपण मदिराप्राशनाचा आनंद घ्यावा.." त्याच लकबीत मकरंदने गरिमाला उत्तर दिले..

दोघेही बराच वेळ मनसोक्त हसत राहिले..

गरिमा आणि मकरंदच्या ग्लासेसनी आवाज करून चियर्स झाल्याचे संकेत दिले..

त्यानंतर बराच वेळ ते दोघे मदिरेचा सिप बाय सिप आस्वाद घेत गप्पा मारत बसले होते..

काय बरे टाकले होते मकरंदने गरिमाच्या नकळत तिच्या ग्लासमध्ये..??

शेवटचे ३-४ सिप राहिले असताना गरीमाचे ग्लासच्या तळाशी लक्ष गेले..

गरिमा स्तिमित होऊन मकरंदकडे पाहत राहिली..

मकरंदने तिच्यासमोर आपल्या हृदयाचा खास आणि तिच्यापासून आजवर लपवून ठेवलेला कप्पा रिकामा केला..

त्याने तिला त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी रीतसर प्रोपोज केले..

ग्लासच्च्या तळाशी छान नाजूक अशी नक्षीकाम ल्यालेली अंगठी होती..

गरीमासाठी एक प्रकारचा धक्काच होता तो.. कारण ती त्याला फक्त आपला चांगला मित्र समजत होती.. त्याच्याशी बोलून.. त्याच्या जवळ मनमोकळे करून बरे वाटायचे तिला..

पण त्याच्या मनात असे काहीतरी असेल असे तिला स्वप्नात देखील वाटले नव्हते..



प्रकरण २२

गरीमाने प्रथमतः त्याला नाही म्हणून सांगितले..

ती सध्या आयुष्याच्या निराळयाच वळणावर होती.. आहे त्याच समस्यांची मोळी डोईजड झाली होती.. त्यामुळे तिला सध्या तरी इतर कशाचाही विचार करायचा नव्हता..

मकरंदला अर्थातच तिच्या उत्तराने वाईट वाटले होते..

पण तो काही हार मानणाऱ्यांपैकी नव्हता..

परत योग्य संधी साधून या विषयाला हात घालण्याचा मनाशी ठाम निश्चय करून त्याने तात्पुरता विषय बाजूला ठेवला होता इतकेच..

गरीमाला आधी तिच्या आयुष्यातील गुंता सोडवायचा होता..



तिने हा गुंता सोडवण्यासाठी काही गोष्टींची मनात जुळवा जुळव सुरु केली..

तिच्या डोक्यात काहीतरी शिजत होते..

ती दिवाणखान्या मधे सोफ्यावर बसून टीव्ही पाहत असताना समोर सुरु असलेल्या धारावाहिकाच्या दृष्यातून तिला या प्रकरणातून बाहेर पडण्याचा मार्ग मिळाला होता..

चूक काय.. बरोबर काय.. या सर्वांच्या पुढे जाऊन.. आयुष्यभर उराशी बाळगलेली तत्वांना तिलांजली देत.. तिने मनाशी काहीतरी निश्चित केले..

बहिणाबाईंच्या ओळी खरंच हि गरीमाची सध्याची मनःस्थिती देखील समर्पकपणे वर्णन करत आहेत..

“मन जहरी जहरी
याचं न्यारं रे तंतर
अरे, विंचू, साप बरा
त्याला उतारे मंतर!”

आपल्या सावजावर झडप घालण्यासाठी तिला मकरंदच्या रूपात सहभागी मिळाला होता..

गरीमाने मकरंदला आपल्या कटात सामील होऊन मोहीम पार पाडण्यास मदत करण्याबद्दल विचारले.. तिने त्याला मोहीम समजावून सांगितली आणि ती लवकरात लवकर फत्ते करण्यासाठी योजना आखण्याची गरज असल्याचे सांगितले..

जर मोहीम यशस्वीरीत्या पार पडली तर तुला हवे ते होईल असे गरिमाने मकरंदला वचन दिले..



प्रकरण २३

मकरंद एवढा भाळला होता गरिमावर कि आपण करत आहोत ते बरोबर कि चूक याचा विचारही त्याने केला नाही..

त्या दोघांनी व्यवस्थित आखणी करून कट पूर्णत्वास नेला होता..

मकरंदने त्या इंजेकशनचा रिसर्च करून.. कश्या पद्धतीने ते मेडिकल मधून आणता येईल याची माहिती मिळवली.. आणि त्याप्रमाणे योजना आखली..

त्याला ते इंजेकशन घेऊन गरीमाला सुपूर्त करायचे होते.. त्या पुढचा बाकी कार्यभाग गरीमाला साध्य करायचा होता..

मकरंदसाठी ही गोष्ट काही फार अवघड नव्हती.. तो ज्या व्यवसायामध्ये होता त्यात त्याला अशा गोष्टी बऱ्याचदा कराव्या लागत असल्यामुळे.. तसेच त्याच्या बऱ्याच ओळखी असल्यामुळे त्याने हे काम कमी वेळात पार पाडले..



ठरल्याप्रमाणे त्याने जे औषध इंजेकशनद्वारे तन्मयला द्यायचे होते त्याचा रिसर्च केला.. ते कुठून मिळविता येईल.. कश्या पद्धतीने आणि शरीराच्या कोणत्या भागात दिल्यावर जास्त परिणामकारक ठरेल.. दिल्यानंतर ते किती वेळात आपला परिणाम दाखवायला सुरुवात करते.. वगैरे वगैरे..

त्याने ठरल्याप्रमाणे ते इंजेकशन आणि मिळवलेली सर्व माहिती गरिमाकडे सुपूर्त केली..

गरिमा योग्य संधीची वाट पाहत होती जेव्हा तिला तिचा कार्यभाग साधायचा होता..

द बॉल वॉज नाऊ इन गरिमाज कोर्ट.. अँड शी वॉज वेटींग टू हंट हर टारगेट..

एका मध्यरात्री तन्मय गाढ झोपेत असताना गरीमाने त्याला ते इंजेकशन दिले..

ते इंजेक्शन पहिल्या १५ मिनिटांतच माणसाचे स्वतःवरचे तसेच स्वतःच्या हालचालींवरचे नियंत्रण पूर्णतः निकामी करत असे..

तन्मयला काहीतरी अणकुचिदार वस्तूचा मानेला स्पर्श झाल्याने अचानक जाग आली..

तन्मय इंजेकशनच्या स्पर्शाने उठणे हे गरिमाला अपेक्षितच होते.. ती त्याच्या उठण्याची वाट बघत तशीच त्याच्या उशाशी बसून राहिली..

तन्मय पलंगावरून उठण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याला अतिशय कुत्सितपणे हसत असलेली गरिमा दिसली.. ती हातात इंजेकशन घेऊन पलंगावर त्याच्या शेजारी बसलेली..

गरिमाकडे त्याला त्याच्या चुकांचा पाढा वाचवून दाखवण्यासाठी आणि आपल्याला या थराला जाण्यास त्यानेच प्रवृत्त केल्याचे त्याला जाणवून देण्यासाठी फक्त १५ मिनिटे होती..

"तन्मय अभ्यंकर आपण हे बरोबर केले नाही.. एका चांगल्या घरच्या उच्चशिक्षित.. स्वावलंबी मुलीच्या आयुष्याचा खेळखंडोबा करून ठेवलात.. आपणांस आपल्या वेगळे असण्याची कल्पना लग्ना आधीपासूनच होती.. तरीही आपण माझे आयुष्य उध्वस्त केले.. बघा नीट डोळे उघडून काय अवस्था केली आहे आपण माझी.. मी अतिशय करियर ओरियन्टेड मुलगी होते.. मला माझ्या क्षेत्रात



बरीच उंची गाठायची होती.. सुखाने संसार करायचा होता.. संसारात योग्य वेळी योग्य गोष्टी करायच्या होत्या.. मुलाबाळांचे संगोपन करायचे होते..

किती आणि काय सांगू तुम्हाला.. आणि मी या सर्व गोष्टींची तुम्हाला लग्ना आधीच्या भेटीतच कल्पना दिली होती.. "

प्रकरण २४

तन्मयला काय चालू आहे काहीच कळत नव्हते.. तो फक्त डोळे विस्फारून गरिमाकडे बघत होता..

त्याला आपल्याला काहीतरी मानेला टोचले एवढेच कळले होते..

गरिमाला आज नेमके काय झाले आहे.. आणि ती कोणत्या थराला जाण्याच्या गोष्टी करते आहे याचा तन्मयला थांग पत्ता लागत नव्हता..

गरिमा आपल्या हातातील इंजेकशनचे सिरिंज तन्मयच्या चेहऱ्यावर फिरवू लागली.. त्याच्या हनुवटीवर सिरिंजचे टोक जोरात दाबत ती ओरडली “हो की नाही ते बोला लवकर.. माझ्याकडे वेळ खूप कमी आहे.. "

तन्मय या साऱ्या प्रकाराने घाबरून गेला होता.. तिचा रौद्रावतार पाहून आता ती म्हणते आहे तेच करण्यात शहाणपणा आहे.. नंतरचे नंतर बघू.. असा विचार करून तन्मय बोलू लागला..



"खरे आहे गरिमा.. माझे चुकले.. आपण यातून तुला इथून पुढे कमीत कमी त्रास होईल असा मार्ग काढू या.. तू प्लिज शांत हो सध्या.. "

गरीमाला बोलण्यात गुंतवून तिची नजर चुकवून तन्मय पलंगावरुन खाली उतरला.. शयनकक्षामधून बाहेर दिवाणखान्याकडे पळ काढण्याच्या प्रयत्नात असताना ड्रेसिंग टेबलला जोरदार धडकला.. तो जमिनीवर कोसळला.. आणि तसाच सरकत सरकत दिवाणखान्या मध्ये आला..

गरीमाला माहीत होते हा जास्तीत जास्त अजून ५ मिनिटे प्रतिकार करू शकेल.. म्हणून ती बिनधास्त होती..  त्याला जे काही हातपाय मारायचे आहेत ते मारू दे.. असा विचार करत गरिमा त्याच्या चेहऱ्यावरील भीतीची गर्द छाया बघून मनोमन सुखावत होती..

तन्मय तसाच कोपरावर सरपटत सरपटत दिवाणखान्या मध्ये आला.. तो अतिशय भेदरलेल्या नजरेने गरिमाच्या नवीन अवताराकडे बघत होता..

गरिमा मात्र अतिशय विकृतपणे हसत हसत तन्मयकडे पाहते आणि म्हणते "खूप उशीर झालाय तन्मय आता.. युवर टाइम इज ओवर.. "



तन्मयला काय घडते आहे कळेपर्यंतच १५ मिनिटांचा कालावधी निघून गेला होता..

१५ मिनिटांनंतर त्याचा श्वास चालू असला तरी तो अर्धमेला होऊन निपचित पडला होता..

गरिमाला तिचा पुढचा कार्यभाग साध्य करण्यासाठी तन्मयच्या या अवस्थेचा फार फायदा होणार होता..

तन्मय मरण्याआधी गरिमाला त्याला विष द्यायचे होते..  जेणेकरून त्याने विष घेऊन आत्महत्त्या केल्याचे शवविच्छेदनात निष्पन्न होईल..

स्वतःच्या हुशारीचा वापर करून.. मनातील असूयेला शांत करण्यासाठी.. तिने तन्मयला या जगातून हद्दपार केले होते..

गरिमा इतके सगळे करून- सवरूनही पुराव्यांअभावी निर्दोष सुटली होती..



त्याच तोऱ्यात या घडीला गरीमाला सारेच तुच्छ वाटत होते.. जग जिंकल्याच्या आविर्भावात ती आराम खुर्चीवर हेलकावे घेत होती..

या जगाचा संपर्क तुटल्या सारखी वागत होती ती..

मकरंद तिला विचारत राहिला पण तिने त्याला काहीच प्रत्युत्तर दिले नाही..

खुर्ची अजूनही हेलकावे खात होती..

मकरंद फक्त गतप्राण गरीमाला खुर्चीवर हेलकावे घेताना पाहत होता..

अचानक आलेल्या हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने गरिमा इहलोकीच्या प्रवासाला गेली होती..

क्षणभंगुर असूयेला वेळीच योग्य मार्गाने न शमविल्याने.. तिच्यावर वेळीच संभाषण किंवा समुपदेशनाने तोडगा न काढल्यामुळे.. तिचे सूडभावनेत रूपांतर झाले होते..


याच सूडभावनेने होत्याचे नव्हते झाले होते..

तन्मय त्याच्या वेगळेपणाशी आयुष्यभर झुंज देत.. सामाजिक चौकटीत स्वतःला बांधून ठेवण्याच्या प्रयत्नामुळे.. कधीही स्वतःला मोकळेपणाने व्यक्त करू शकला नसल्याच्या असाह्यतेमुळे..

तर गरिमा स्वतःच्या वाट्याला आलेल्या फसवणुकीच्या ढिगाऱ्याखाली गाडली जाऊन.. आपल्या मूल्यांशी प्रतारणा करत.. आयुष्याशी हतबलपणे झुंज देत..


प्राणांना मुकले होते..

***** समाप्त *****




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/abolee_ketakee_shah.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/arunodaya_ketakee_shah.pdf





# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.